**मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. प्लॉट नं. ए-२३, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित प्लॉट नं. ए-२४, ए-३०, एमआयडीसी क्षेत्र, तडाली विस्तार केंद्र, तडाली, जिल्हा-चंद्रपूर येथे प्रस्तावित (१५टन/तास x ०४) प्रवर्तन भट्टी प्रस्तावित करून १८००० टन/महिना (२१६००० टन/वर्ष) एम.एस. बिलेट्स तयार करणे, दोन रोलिंगमिल प्रस्तावित करून १८००० टन/महिना (२१६००० टन/वर्ष) हॉट रोल्ड टीएमटी तयार करणे आणि २ x ९ एमव्हीए सबमर्ज्ड आर्क फरनेस प्रस्तावित करून ६००० टन/महिना (७२००० टन/वर्ष) फेरो अलॉयज तयार करण्याच्या प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहिर सुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **०७/१२/२०१८** |
| **वेळ** | : | **दुपारी ०३.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **प्रकल्प स्थळ, प्रशासकीय इमारत, मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि., प्लॉट नं. ए-२३, म.औ.वि.मं. ताडाली, ता. जि. चंद्रपूर.** |

**<u>प्रस्तावना</u>:-**

मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. प्लॉट नं. ए-२३, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित प्लॉट नं. ए-२४ व ए-३०, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर येथे प्रस्तावित प्रस्तावित (१५टन/तास x ०४) प्रवर्तन भट्टी प्रस्तावित करून १८००० टन/महिना (२१६००० टन/वर्ष) एम.एस. बिलेट्स तयार करणे, दोन रोलिंगमिल प्रस्तावित करून १८००० टन/महिना (२१६००० टन/वर्ष) हॉट रोल्ड टीएमटी तयार करणे आणि २ x ९ एमव्हीए सबमर्ज्ड आर्क फरनेस प्रस्तावित करून ६००० टन/महिना (७२००० टन/वर्ष) फेरो अलॉयज तयार करण्याच्या प्रस्तावाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना अर्ज सादर केल्यानंतर प्रकल्पाकरिताच्या राज्य पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (SEAC) यांनी त्यांच्या दि. १४.०६.२०१८ रोजी झालेल्या १५२व्या (दिवस-३रा) बैठकीमध्ये सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक मान्यता (TOR) जारी केले (सहपत्र-१) व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश आहेत.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. ०७.१२.२०१८ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. ३१.१०.२०१८ रोजीच्या मराठी दैनिक"लोकमत" व दैनिक "लोकसत्ता" व इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली.

१) पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२) सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३) प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
५) जिल्हा परिषद, चंद्रपूर.
६) जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
७) उप-अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, चंद्रपूर.
८) उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९) तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
१०) पंचायत समिती कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
११) ग्रामपंचायत कार्यालय, येरूर, ता. जि. चंद्रपूर.
१२) ग्रामपंचायत कार्यालय, सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर.
१३) ग्रामपंचायत कार्यालय, तडाली, ता. जि. चंद्रपूर.
१४) ग्रामपंचायत कार्यालय, मोरवा, ता. जि. चंद्रपूर.
१५) ग्रामपंचायत कार्यालय, मुरसा, ता. जि. चंद्रपूर.
१६) ग्रामपंचायत कार्यालय, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर.
१७) ग्रामपंचायत कार्यालय, चारगांव, ता. जि. चंद्रपूर.
१८) गट-ग्रामपंचायत कार्यालय, नागाळा (वांढरी व चिंचाळा), ता. जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ४ ते १८ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. अशा तऱ्हेने जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये मध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्प बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ, प्रशासकीय इमारत, मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि., प्लॉट नं. ए-२३, म.औ.वि.मं. ताडाली, ता. जि. चंद्रपूर निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाजवळचे असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

| | | |
|---|---|---|
| १) श्री घनश्याम भूगांवकर,<br>अप्पर जिल्हा दंडाधिकारी,चंद्रपूर | - | **अध्यक्ष,** |
| **२)** श्री राजू आर. वसावे,<br>प्रभारी प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| **३)** श्री प्रताप जगताप,<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, चंद्रपूर | - | **समन्वयक** |

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२, ३ व ४ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्त:-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. प्रताप जगताप, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक,सुचना,विचार,आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली.तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी उपस्थित जनसमुदायास मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. प्लॉट नं. ए-२३, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित प्लॉट नं. ए-२४ व ए-३०, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर येथे प्रस्तावित (१५टन/तास x ०४) प्रवर्तन भट्टी प्रस्तावित करून १८००० टन/महिना (२१६००० टन/वर्ष) एम.एस. बिलेट्स तयार करणे, दोन रोलिंगमिल प्रस्तावित करून १८००० टन/महिना (२१६००० टन/वर्ष) हॉट रोल्ड टीएमटी तयार करणे आणि २ x ९ एमव्हीए सबमर्ज्ड आर्क फरनेस प्रस्तावित करून ६००० टन/महिना (७२००० टन/वर्ष) फेरो अलॉयज तयार करण्याच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री. मधुसुदन राव व पर्यावरण सल्लागार श्री. राजेश श्रीवास्तव यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला.सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.

- नियोजीत प्रकल्पांमुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पण्या, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे:**

१) **<u>श्री बृजभुषण महादेव पाझारे, राहणार- नाकोडा, जिल्हा -चंद्रपूर</u>**

| **अ. क्र.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सादरीकरण प्रकल्प प्रवर्तकांनी दाखविले. झाडे लावण्याची व वाढविण्याची संख्या वाढली पाहिजे. हरितपट्टा विकसित करण्यासाठी इतर गावांचाही अंतर्भाव करण्यात यावा. ज्या ग्रामपंचायतींचा समावेश होणार आहे, त्या सर्वच ग्रामपंचायती ह्या आदर्श ग्रामपंचायती म्हणून व्हायला हव्यात. प्रकल्पास वर्धा नदीचे पाणी घेतले जाते. त्यासाठी वर्धा नदीवर बंधारा बांधणे आवश्यक आहे. | प्रकल्प प्रवर्तकाना असे स्पष्ट केले की , प्रकल्पातील खुल्या जागेच्या ३३% जागेवर वृक्षारोपण करण्यात येईल व रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावण्यात येतील. ग्रामपंचायतीच्या मदतीने वृक्षारोपणाचे कार्यक्रम करण्यात येईल. सदरहू वृक्षारोपण हे ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेच्या मंजूरीने करण्यात येईल. भारत सरकारच्या नविन कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधितून दरवर्षी ₹ ३५.० लाख खर्च करण्यात येईल. |
| २) | सीएसआर च्या माध्यमातून अंगणवाडीतील मुलांना दत्तक घ्यावे. आरोग्याची सुविधा पूरविण्यात यावी. तसेच अग्निशमन केंद्र उद्योगाने उभारावे. | सदरहू सूचनेची नोंद घेण्यात आली. आरोग्याची सुविधा पूरविण्याकरिता आजूबाजूच्या गावातील लोकांची आरोग्याची तपासणी करण्यात येईल. तसेच रुग्णवाहिकेची सुविधा सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ३) | प्रकल्पात स्थानिकांना रोजगार द्यावा. त्यासाठी ग्रामपंचायतींना पत्र द्यावे. ग्रामपंचायतींकडून आलेल्या यादीप्रमाणे उमेदवार बोलविण्यात यावे. | सदरहू सूचनेची नोंद घेण्यात आली. |

२) इंदिरा मधुकर, सरपंच ताटवदे, जिल्हा-चंद्रपूरः-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रणात आणले पाहिजे. स्थानिक बेरोजगारांना रोजगार देण्यात यावा. ज्या कामगारांना नोव्हेंबरमध्ये काढण्यात आले, त्यांना परत कामावर घेण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकाना असे स्पष्ट केले, १२६ लोकांना काढले होते. त्यापैकी ११४ लोकांना परत घेतले असून एक महिन्याच्या आत उर्वरित लोकांना नोकरी देऊ. |

३) सौ. शोभा जनार्दन पिदुरकर, राहणार-मोरवा, जिल्हा-चंद्रपूर,

| अ. क्र. | सूचना/प्रश्न |
|---|---|
| १) | प्रकल्पाचे अभिनंदन करत असून कंपनीने ज्या लोकांना कामावरुन काढले आहे, त्यांना परत घ्यावे व नविन बेरोजगार मुलांनाही रोजगार द्यावा. |

४) श्री संतोषकुमार रामजी व्दिवेदी, राहणार-खोटाळा,

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | येथे झालेल्या चर्चेतून एकच दिसते की सर्वांची इच्छा आहे की सदरहू प्रकल्प कार्यान्वित व्हावा. मात्र प्रदूषण नियंत्रणाचे सर्व मानके पाळणे आवश्यक आहे व रोजगाराचा प्रश्न निकाली काढावा. |

५) श्री. सुधाकर एकंटवार, राहणार-ताडाली. जिल्हा-चंद्रपूरः-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पात कार्यरत असणा-यां ना भविष्यनिर्वाह निधी व इतर सुरक्षाप्रणाली पुरविण्यात येत नाही. बोनस न दिल्याच्या कारणास्तव संप केल्याने आम्हाला ४० लोकांना बाहेर काढले. अजूनही आम्हाला ऑक्टोबर महिन्याचे वेतन देण्यात आले नाही. तसेच आम्हाला परत कामावर कधी घेणार याबाबत सांगावे. | प्रकल्प प्रवर्तकाना असे स्पष्ट केले,सदरहू प्रश्नाचे लवकरात लवकर निराकरण करण्यात येईल. कामगारांचा पगार जर थकित असेल, तर तो येत्या दोन दिवसात त्यांना देण्यात येईल. तसेच एक महिन्याच्या आत कामावर घेण्यात येईल. |

६) श्री किरण बांदूरकर, नाकोडा, जिल्हा-चंद्रपूरः-

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | कंपनीने कामावरुन कमी केलेल्या ४० लोकांना एका महिन्याच्या आत रोजगार द्यावा. या कंपनीचे मी स्वागत करीत आहेत. |

### ७) नामदेव बबनराव डाऊल, सभापती, पंचायत समिती, चंद्रपूर:-

| अ. क्रं. | सूचना/प्रश्न |
|---|---|
| १) | कंपनीने ज्या कामगारांना कामावरुन काढले, त्याना लवकारत लवकर परत कामावर घेण्यात यावे. |

### ८) रोशन पचारे, माजी सभापती, पंचायत समिती, चंद्रपूर:-

| अ. क्रं. | सूचना/प्रश्न |
|---|---|
| १) | कंपन्यांमुळे विविध समस्या जसे नागरिकांचे आरोग्य, नागरी सुविधा पूरविण्यात याव्या व ज्या कामगारांना कामावरुन काढले, त्यांना परत लवकरात लवकर घ्यावे. या प्रकल्पाच्या समर्थनाला आमचा विरोध आहे. परिसरातील जनतेच्या आरोग्यावर प्रदूषणामुळे परिणाम होत आहे, परिसरातील आजु-बाजूच्या गावातील नागरीकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबाबत आरोग्य विभागाकडून तपासणी करण्यात यावी व अहवाल द्यावा. |

### ९) श्री गजानन नारायण पारखे, राहणार-तडाली, जिल्हा-चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी व इतर चार शेतक-यांची सात-सात एकर शेत कंपनीला लागूनच आहे. कापसाचे उत्पादन घेतो. संपुर्ण कापुस काळा झालेला आहे. कापसाला भाव मिळत नाही. कंपन्या रस्त्यावर पाणी मारत नाही. प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा नियमितपणे कार्यान्वित ठेवली, तर प्रदूषणाची समस्या सुटेल. रात्री धुर सोडण्यात येतो. त्यामुळे परिसरात आजाराचे प्रमाण वाढलेले आहे. परिसरातील इरावती नदीची स्थिती खराब होईल. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. सांडपाणी सयंत्रणा बसविणे जर खर्चिक असेल तर सर्व कंपन्यांनी सामाईक सांडपाणी सयंत्रणा उभारावी. सीएसआर फंडातून संत तुकडोजी महाराजांच्या मंदिरासाठी वर्गणी द्यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी असे स्पष्ट केले की प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा नियमितपणे कार्यान्वित केली जाईल, तसेच पाण्याची फवारणीदेखील नियमितपणे करण्यात येईल. पुतळ्यास ₹ २१०००/- देणगी देण्यात येईल. |

### १०) श्री संतोष रामटेके, राहणार-तानवडी, जिल्हा-चंद्रपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना |
|---|---|
| १) | सदर कंपनीत मी पाच वर्षापासून कामावर आहे. बोनसची मागणी केली असता कंपनीने आम्हा चाळीस लोकांना कामावरुन कमी केले आहे. कंपनीतर्फे आम्हास बोनस देण्यात येत नाही तसेच पीएफ कापण्यात येत नाही. तरी लवकारात लवकर कामावर घ्यावे. अन्यथा आम्ही आंदोलन करणार. |

११) सौ. अमृत्ता फुलझुले, सरपंच, ग्रामपंचायत, सोनेगाव, जिल्हा-चंद्रपूर:-

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | अंतुरला ते सोनेगाव रस्ता रस्ता संपूर्ण खराब आहे. तो रस्ता दुरूस्त करून द्यावा. त्याचप्रमाणे सोनेगावात सुशिक्षित बेकार आहेत. तरी कमीतकमी पन्नास मुलांना प्रकल्पात काम द्यावे. |

१२) सौ. चंद्रकला असुरकर, सदस्य, मोरवा ग्रामपंचायत,

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | मे. ग्रेस या कंपनीव्यतिरिक्त इतरही कंपन्या या परिसरात कार्यरत असून रोजगाराची संधि उपलब्ध झालेली आहे. प्रस्तावित उद्योगाचे मी स्वागत करतो. |

१३) विलासगुरुजी भगत, माजी सदस्य जिल्हा परिषद, चंद्रपुर, राहणार-साखरवाही, जिल्हा-चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | मी एक शेतकरी म्हणून विषय मांडत आहे. सीएसआर फंड हा शेतीसाठी नाही. सीएसआर फंडातून शेतक-यांना एकही रुपया मिळत नाही. प्रदूषणामुळे शेतक-यावे मोठे नूकसान होत आहे तरी शेतक-यांसाठी राखीव निधी ठेवण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी असे स्पष्ट केले की, शासनाच्या नविन सीइआरप्रमाणे शेतक-यांसाठीदेखील निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. |

१४) श्री रणजीत गजानन सोयाम, राहणार-साखरवाडी,जिल्हा – चंद्रपूर

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित झाला पाहिजे. त्यामुळे रोजगार उपलब्ध होतील. |

१५) सौ.कविता सोनटक्के, राहणार-सोनेगाव, जिल्हा-चंद्रपूर:-

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | आमच्या शेतजमिनी एमआयडीसीने अधिग्रहण केलेल्या आहेत. त्यामुळे आमच्या मुलांना व गावातील महिलांना रोजगार द्यावा. तसेच नाल्याच्या पाण्याचा प्रदूषणाचा प्रश्न व आरोग्याचा प्रश्न सोडवा. प्रकल्पात महिलांना काम देण्यात यावे. |

१६) श्री सुबोध कासळकर, तडाली, जिल्हा-चंद्रपूर

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | प्रदूषणाविषयीची समस्या सोडविण्यात यावी. |

**१७) श्री दिनेश चोखारे, सभापती, बाजार समिती, माजी सभासद,जिल्हा परिषद,चंद्रपूरः-**

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | सदरहू बैठकीबाबत एकंदर किती तक्रारी/आक्षेप वा सूचना आल्या व त्यात किती सकारात्मक व किती नकारात्मक आल्या, त्याची इतिवृतान्तात नोंद घेण्यात यावी. या परिसरात वाघाचे अस्तित्व असून त्याची प्रकल्प अहवालात नोंद घेण्यात यावी. प्रकल्पात किती तांत्रिक पदे आहेत व किती नाहित याची माहिती मिळणे योग्य होते. प्रकल्पाला विरोध नाही. प्रथम प्रदूषण नियंत्रण व नंतरच प्रकल्प हीच माझी व स्थानिकांची इच्छा आहे. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यातआलेल्यासूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिलामाळा, उद्योगभवन, रेल्वेस्टेशनरोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(प्रताप जगताप )** | **(राजू वसावे)** | **(घनश्याम भूगांवकर )** |
| समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरणविषयकक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रभारी प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |